# प्रेस नोट

( सिंधुदूर्ग जिल्हा पोलीस )

दिनांक- ०१ जुन २०१९

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात राबविण्यात येणाऱ्या पोलीस कल्याण योजनेबाबत जागरुकता निर्माण होण्याकरिता सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये दि.०१ जून २०१९ त ७ जून २०१९ या कालावधीत पोलीस कल्याण सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आज सिंधुदूर्गनगरी पोलीस मुख्यालयाचे ठिकाणी सकाळी ११.०० वाजता पोलीस अधीक्षक, मा.श्री.दिक्षीत गेडाम, व अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.निमीत गोयल यांचे हस्ते उद्घाटन सोहळा कार्यक्रम पार पडला. सदर प्रसंगी पोलीस कल्याण योजनांची माहिती असलेल्या भित्तीपत्रकांचे वितरण पोलीस कार्यालयांना करण्यात आले. तसेच पोलीस अधीक्षक मा.श्री.दिक्षीत गेडाम यांच्या संकल्पनेतुन तेजस्वीनी एंटरप्रायजेस च्या वतीने डॉ.रघुनाथ गावडे व त्यांचे सहकारी यांचे वतीने पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांकरीता अत्यंत अल्प दरात संपुर्ण शारीरीक तपासणी चे आयोजन करण्यात आले. अत्याधुनिक यंत्र सामुग्रीद्वारे संपुर्ण शारीरीक तपासणीचे लाभ घेण्यासाठी सिंधुदूर्गनगरी येथील सर्व पोलीस कार्यालयातील पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक मा.श्री.दिक्षीत गेडाम यांनी उपस्थितांना सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये राबविल्या जाणाऱ्या पोलीस कल्याण योजनांबाबतची माहिती देऊन मार्गदर्शन केले. सदर सप्ताहामध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांकरीता विविध स्पर्धांचे, आरोग्य शिबीर अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय,सिंधुदूर्ग.